**<u>फौजदारी प्रक्रिया संहितेचे कलम २९९ प्रमाणे पुरावा</u>**

नि.फौ.ख.क्र. ६६/२००९

सरकार –वि– शेख शकील

नि.क्र.२१

**<u>सरकार तर्फे साक्षीदार क्रमांक ०३ यांची जबानी</u>**

मी याद्वारे प्रतिज्ञापूर्वक निवेदन करतो कीः–

माझे नाव – राजु ओंकार शिंदे,

वय – ६० वर्षे, व्यवसाय – मजुरी,

राहणार – सरकारी फैल, शेगाव, ता. शेगाव, जिल्हा – बुलडाणा.

**<u>सरतपासणी सरकार तर्फे श्रीमती एस. व्ही. इंगळे, सहाय्यक सरकारी अभियोक्ता.</u>**

१. दि.१०.०७.२००९ रोजी माझ्या समक्ष जप्ती पंचनामा झाला नव्हता. आता मला जप्ती पंचनामा दाखविण्यात आला. त्यावर पंच क्र.१ म्हणून माझी सही आहे. त्यातील मजकूर मला माहिती नाही. त्याला सहीपुरता **<u>नि.क्र.२२</u>** देण्यात येते.

**<u>साक्षीदार अभियोग पक्षास सहकार्य करत नसल्याने सरकारी अभियोक्ता यांच्या विनंती वरुन उलट तपासणी करण्याची परवानगी देण्यात येत आहे</u>. <u>उलट तपासणी अभियोग पक्षातर्फे सरकारी अभियोक्ता यांच्यामार्फत</u> :–**

२. हे म्हणणे खरे नाही की, दि.१०.०७.२००९ रोजी पोलीसांनी माझ्या समक्ष जप्ती पंचनामा तयार केला होता. हे म्हणणे खरे नाही की, आरोपी शेख शकीलकडून पोलीसांनी माझ्या समक्ष जप्ती पंचनाम्यातील नमुद मुद्देमाल जप्त केला होता. हे म्हणणे खरे नाही की, पोलीसांनी माझ्या समक्ष जप्ती पंचनामा तयार करुन तो मला वाचून दाखविला व मी त्यावर वाचून समजून सही केली होती. आरोपी शेख शकील याला मी ओळखत नाही. हे म्हणणे खरे नाही की, आरोपी शेख शकीलला शिक्षेपासून वाचविण्यासाठी मी खोटी साक्ष देत आहे.

**<u>सरतपास संपला.</u>**

श्रवणोत्तर स्विकृत
स्वा/–
( एन. डी. मेश्राम )
न्या.दं.प्र.वर्ग कोर्ट क्र.१, शेगांव
दि.१७.०३.२०२६

माझे समक्ष
स्वा/–
( एन. डी. मेश्राम )
न्या.दं.प्र.वर्ग कोर्ट क्र.१, शेगांव
दि.१७.०३.२०२६